# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

निर्णय क्र. मविनिआ/माअअ/२०२४/अपील/१४/२०२४/0789 दिनांक: ११.१२.२०२४

| | | |
|---|---|---|
| माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | : | १६.१०.२०२४ |
| जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याचा दिनांक | : | १४.११.२०२४ |
| प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | : | ०२.१२.२०२४ |
| प्रथम अपील निकाली काढल्याचा दिनांक | : | ११.१२.२०२४ |

सक्षम प्रथम अपीलीय अधिकारी

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई

(माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ अंतर्गत)

अपील क्र. १४/२०२४

श्री. नामदेवराव सुं. आहिरे ... अपीलकर्ता

विरुद्ध

जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई ... प्रतिवादि

आपीलाचे तथ्य:-

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१०.२०२४ रोजी माहिती अधिकार कायद्याअंतर्गत केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दिनांक १६.१०.२०२४ रोजी प्राप्त झाला. आपीलार्थी यांच्या दिनांक १६.१०.२०२४ रोजी माहिती अधिकार कायद्याअंतर्गत दाखल केलेल्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १४.११.२०२४ रोजी चे पत्रांन्वये समाधानकारक माहिती न पुरवल्यामुळे आपीलार्थी यांनी दिनांक ०२.१२.२०२४ रोजी त्याच माहितीसाठी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे अर्ज दाखल केले. (अर्ज प्रथम अपील आयोगाच्या कार्यालयास दिनांक ०२.१२.२०२४ रोजी प्राप्त झाला).

प्रथम आपीलीय अधिकारी यांनी आपीलार्थी यांना दिनांक ०३.१२.२०२४ रोजी नोटिस पाठवून दिनांक १०.१२.२०२४ रोजी अर्जा वर सुनावणी आयोजीत केली होती. दिनांक १०.१२.२०२४ रोजी सुनावणी साठी आपीलार्थी हजर झाले नाहीत तथा सुनावणीची तारीख/वेळ बदलून देण्याची कुठलीही विनंती आपीलार्थी कडून प्राप्त झालेली नाही. जन माहिती अधिकारी सुनावणी साठी हजर झाले व त्यांनी सुनावणी दरम्यान मौखिक निवेदन सादर केले.



१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai - 400 005.
Tel.: 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969
E-mail : mercindia@merc.gov.in Website : www.merc.gov.in

**अपीलातील निवेदवारून आपिलातील मुद्दे खालील प्रमाणे आहे:-**

**मागीतलेली माहिती :**

माझ्या दि. १२.०८.२०२४ रोजीच्या तक्रार अर्जावर जी काही कायदेशीर कारवाई केली असल्यास, त्याबाबत सविस्तर माहिती कागदोपत्रासह देण्यात यावी.

**जन माहिती अधिकारी यांचे उत्तर:**

याबाबत कार्यालयामार्फत कामकाज सुरू आहे. कामकाज पूर्ण झाल्यानंतर माहिती उपलब्ध करून देण्यात येईल.

**प्रथम अपील दाखल करण्याचे कारण:**

जन माहिती अधिकारी यांनी अर्धवट व चुकीची माहिती दिलेली आहे.

**अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे:**

सदर अपीलामध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १२.०८.२०२४ रोजी मा. ऊर्जा मंत्री महाराष्ट्र शासन यांना पाठवलेल्या तक्रार अर्जामधील विद्युत लोकपाल मुंबई यांच्या निष्कर्षांबद्दल प्रश्न उपस्थित केले होते. सदर अर्जावर जी काही कायदेशीर कारवाई केली असल्यास त्याबाबत सविस्तर माहिती कागदोपत्रासह देण्याबाबत मागणी केलेली आहे.

त्याअनुषंगाने दिनांक १२.०८.२०२४ रोजीच्या तक्रार अर्जानुसार व जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहिती नुसार सदर माहिती विद्युत लोकपाल मुंबई यांच्या विविध प्रकरणात पारित केलेल्या निर्णया संबंधित असल्याचे दिसून येते. सदर तक्रार अर्ज मा. ऊर्जा मंत्री महाराष्ट्र शासन यांच्या नावे पाठवल्यामुळे ऊर्जा विभागाकडून तक्रार न. ७२५७०३२ द्वारे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या कार्यालयाकडे त्याबाबत विचारणा करण्यात आली. त्यानुसार, दिनांक १९.११.२०२४ रोजी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या कार्यालयाकडून सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने ऊर्जा विभागास कळवण्यात आले आहे. शिवाय त्याची एक प्रत दिनांक ०५.१२.२०२४ रोजी अपीलकर्ता यांना पाठवण्यात आलेली आहे.

त्यामध्ये विद्युत लोकपाल ही एक अर्ध-न्यायिक संस्था असल्यामुळे विद्युत लोकपालला त्याच्या/तिच्या सर्व निष्कर्षांची कारणे देऊन, मविनिआ (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० नुसार तिच्यासमोर केलेल्या निवेदनावर निर्णय देण्याचे अधिकार आहेत. शिवाय, ग्राहकाला विद्युत लोकपाल यांनी पारित केलेला निर्णय जर मान्य नसेल तर अश्या ग्राहकांना प्रकरणातील तथ्ये आणि परिस्थितीनुसार उच्च न्यायालयाच्या याचिका अधिकारक्षेत्राचा मार्ग अवलंबन्याची मुभा आहे असा उल्लेख आहे.

वरील बाबी लक्षात घेता असे निदर्शनास येते की, विद्युत लोकपाल ही एक अर्ध-न्यायिक संस्था असल्यामुळे तिच्यासमोर केलेल्या निवेदनावर निष्कर्षांची कारणे देऊन निर्णय देण्याचे अधिकार मविनिआ (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० नुसार विद्युत लोकपाल यांना आहेत. शिवाय, उच्च न्यायालयाच्या याचिका अधिकारक्षेत्राचा मार्ग ही सदर विनियम अंतर्गत उपलब्ध करून देण्यात आलेला आहे वस्तुस्थिती आहे.

त्यानुसार, वरील माहिती आधारे सदर अपील नामंजूर करून निकाली काढण्यात येत आहे.

**जर प्रथम आपीलीय अधिकारी यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०००३२ येथे अपील दाखल करू शकता.**

<u>निर्णय</u>

अपील नामंजूर करून निकाली काढण्यात येत आहे.

(अभिजीत वि. चाटुफळे)

सह संचालक (प्रशासन व वित्त) तथा प्रथम आपीलीय अधिकारी

प्रती,

श्री. नामदेवराव सुं. आहिरे,
सुंदरलाल शा. आहिरे चाळ,
रूम नं. १, मकरानी पाडा, जितेंद्र रोड,
मालाड (पूर्व), मुंबई-९७.

(अभिजीत वि. चाटुफळे)

सह संचालक (प्रशासन व वित्त) तथा प्रथम आपीलीय अधिकारी

प्रत,

जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई